| MHJN050011192021 | **नि. दि. दावा क्र.९४/२०२१**<br>मोहमंद आसिफ मोहमंद इस्माईल तांबोळी वि. राजेश रामगोपाल खंडेलवाल व इतर |
| --- | --- |

## निशाणा क्र.१८ वरील आदेश

प्रस्तुत दाव्यातील वादीने अर्ज उप अधिक्षक भूमी अभिलेख, परतूर यांची वादग्रस्त जमिनीची मोजणी होणेकामी कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक करणेकरीता सदरील अर्ज दाखल केला आहे.

२. वादीच्या अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे,

वादी कथन करतो की, मौजे मसला, ता. परतूर, येथील गट क्र.७९ एकूण क्षेत्रफळ १६ हेक्टर ७६ आर, पैकी वादीची मिळकत ०२ हेक्टर २४ आर ज्याची चर्तु:सिमा पुर्वेस — परतूर शिव, पश्चिमेस — प्रतिवादी क्र.२ यांची मिळकत, दक्षिणेस — रेल्वे मार्ग व उत्तरेस — प्रतिवादी क्र.१ यांची याच गटातील मिळकत, या मिळकतीचा वादी मालक व कब्जेदार आहे. वादी कोर्टाने आदेश केल्यास कोर्ट कमिशनर यांची न्यायालयीन प्रक्रियाच्या आदेशाप्रमाणे पुर्तता करण्याचे फिस व भत्ता न्यायालयात भरण्यास तयार आहे. तसेच, मोजणी फिस उप अधिक्षक, भूमी अभिलेख, परतूर येथे भरण्यास तयार देखील आहे. त्याचप्रमाणे, न्यायालयाने उप अधिक्षक, भूमी अभिलेख, कार्यालय, परतूर यांना वादग्रस्त जमिनीची मोजणी करुन व बांधधुरे कायम करुन व खुणा कायम करुन देणेबाबत आदेशीत करणेकरिता व मोजणी अहवाल नकाशासह न्यायालयात सादर करण्याचे आदेश देण्यात यावेत, नसता वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल व वादीच्या न्याय हक्कावर बांधा येईल. करिता वादीने वादग्रस्त जमिनीची मोजणी उप अधिक्षक भूमी अभिलेख कार्यालया मार्फत होवून मिळणेची विनंती केली आहे.

३. सदरच्या अर्जावर प्रतिवादी क्र.२ यांचे म्हणणे मागविण्यात आले.

प्रतिवादी क्र.२ च्या म्हणण्यानुसार, प्रस्तुत प्रकरणामध्ये वादीचा वाद अतिक्रमीत जमिनीचा ताबा परत मिळणेसाठीचा आहे. वादीने दावा दाखल करण्यापुर्वी भूमी अभिलेख कार्यालयाकडून वादग्रस्त जमिनीची मोजणी करणे आवश्यक होते. वादीने वादग्रस्त जमिनीची मोजणी न करता, अंदाजे १० गुंठे अतिक्रमण झाल्याचे वादी वादात कथन करीत आहे. वादीचा वादच मुळात नियमबाह्य आहे. न्यायालयात वादीस मोजणी करून घेण्याबाबतचा, अर्ज सादर करता येणार नाही. वादीचा प्रस्तुतच अर्ज हा न्यायालयामार्फत पुरावा गोळा करुन दावा चालविण्या साठीचा आहे. करिता वादीचा प्रस्तुत अर्ज नामंजुर करण्यात यावा.

४. प्रस्तुत प्रकरण प्रतिवादी क्र.१ विरुध्द एकतर्फा चालविण्यात येत आहे.

५. वादी प्रतिवादी दरम्यान वाद कथने पाहता, सदर प्रकरण हे हद्दीखुणा बाबत असल्याने तसेच, दावा हा प्रतिवादी यांनी वादीचे वादग्रस्त जमिनी मध्ये अतिक्रमण केलेले आहे. सदर दाव्यामध्ये अधिकृत/एक्सपर्ट मार्फत वादग्रस्त जमिनीची मोजणी होणे न्यायाचे दृष्टीने गरजेचे आहे. त्यामुळे योग्य त्या न्यायापर्यंत जाण्यासाठी व सत्य परिस्थीती कोर्टा समोर येण्यासाठी सदर प्रकरणी वादग्रस्त जमिनीची मोजणी भूमी अभिलेख कार्यालया अंतर्गत होण्याची विनंती केली आहे.

६. वादीचा अर्ज, प्रतीवादी क्र.२ चे म्हणणे यांचे अवलोकन केले. दोन्ही विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. सदरील दाव्याचा योग्य तो निकाल हा वादग्रस्त जमिनीची मोजणी केल्यानंतरच गुण दोषांवर देता येवू शकतो. तसेच, सदरील दावा हा स्थावर मालमत्ते बाबतचा असून त्यामध्ये दोन्ही पक्षांचे हितसंबंध गुंतलेले आहेत. त्यामुळे योग्य तो न्याय होण्यासाठी आणि दाव्यातील गुंतागुंत कमी करण्यासाठी व न्यायाच्या दृष्टीने सदरील अर्ज मंजूर होणे गरजेचे आहे. म्हणून खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. उप अधिक्षक, भूमी अभिलेख, परतूर यांची न्यायालयीन आयुक्त म्हणुन नेमणुक करण्यात येते.

३. न्यायालयीन आयुक्त यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी वादी व प्रतिवादी यांच्या जमिनीची मोजणी करुन व हद्‌दीखुणा निश्‍चित करुन दयाव्यात. तसेच सदरच्या जमिनीची मोजणी करून हद्‌दीखुणा दर्शवून अतिक्रमीत भाग नकाशामध्ये विविध रंगाने रंगवून दर्शवून अतिक्रमणा बाबत नकाशा व अहवाल कोर्टात एक महिन्याच्या आत सादर करावा.

४. वादी यांनी न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे मोजणीसाठीचा संपूर्ण खर्च भूमी अभिलेख यांच्या कार्यालयात परस्पर भरावा. तसेच, त्यांनी योग्य त्या कागदपत्रांची पुर्तता करावी.

५. कोर्ट कमीशनर यांनी दोन्ही पक्षांना अगाउ नोटीस देवून मोजणीचे काम पूर्ण करावे.

६. मोजणी अंती अतिक्रमण दिसून आले, तर ते नकाशात व अहवालात स्पष्टपणे नमुद करावे.

७. योग्य त्या पुर्ततेनंतर सदरील आदेशाची रिट पाठविण्यात यावी.

Digitally signed by VRUSHALI BABURAO DOMBE
Date: 2026.01.14 17:03:49 +0530

(व्ही. बी. डोंबे)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर
परतूर.

दि.१२/०१/२०२६

## CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F. file order are same word to word, as per original order."

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | M. D. Adhe |
| Name of Court | : | V. B. Dombe, |
| | | Civil Judge Jr. Dn., Partur. |
| Order dictated on | : | 12.01.2026 |
| Transcript ready on | : | Directly on Computer |
| Order Signed by | | |
| Presiding Officer on | : | 13.01.2026 |
| Order uploaded on | : | 14.01.2026 |

Digitally signed by MADHAV DEVIDAS ADHE
Date: 2026.01.14 17:04:28 +0530

(Madhav D. Adhe)
Stenographer Grade-3